सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :२२५३/मगकसे-उनि/(मुख्य)/उ.ता./२०२२/१६** **दिनांक :-** १६ मार्च, २०२३

**- घोषणा -**

**विषय :-** महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - २०२२, पेपर क्र. २ (स्वतंत्र पेपर – उद्योग निरीक्षक) या स्पर्धा परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ११ मार्च, २०२३** रोजी आयोजित '**महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा - २०२२, पेपर क्र. २ (स्वतंत्र पेपर - उद्योग निरीक्षक)**' या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेच्या चारही संचाच्या प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. सदर परीक्षेमधील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृत्यांवर / नकाशांवर आधारित प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याचे प्रस्तावित आहे, याची दृष्टीहीन / क्षीणदृष्टी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| संच A | संच B | संच C | संच D |
|---|---|---|---|
| ११ | १५ | १७ | १३ |
| १४ | २० | १२ | १६ |

३. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

४. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक २१ मार्च, २०२३** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

६. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव

ठिकाण : मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई